आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२८ जून २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांच्यात संवाद

- कोल्हापूरच्या चित्रनगरीच्या विविध विकास कामांचं भूमिपूजन आणि लोकार्पण

- ताडोबा-अंधारी प्रकल्पातली व्याघ्र पर्यटन सफारी महाग

आणि

- महिलांच्या टी २० क्रिकेट मालिकेत भारताविरुद्धच्या सामन्यात नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा इंग्लंडचा निर्णय

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात असणारे भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांच्याशी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज संवाद साधला. ॲक्सिओम ४ मोहीमेअंतर्गत बुधवारी अमेरिकेतल्या फ्लोरिडा इथल्या केनेडी स्पेस सेंटरमधून अवकाशात पाठवण्यात आलेल्या यानातल्या चमूमध्ये शुक्ला यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधतील. हा या कार्यक्रमाचा १२३ वा भाग असेल. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व प्रसारण सेवा, युट्यूब वाहिन्या, संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एअर या मोबाईल ॲपवरून या कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल.

**<><><><><>**

संविधानाची उद्देशिका हा संविधानाचा प्राण असतो आणि म्हणून त्यात बदल होत नाही, असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आज ते एका पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात बोलत होते. भारताचा अपवाद वगळता जगातल्या

कोणत्याही देशाच्या संविधानात बदल करण्यात आलेला नाही अशी टिप्पणी त्यांनी केली. आणीबाणीच्या काळात समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि एकात्मता हे शब्द घातल्याने संविधानकर्त्यांच्या धारणांशी प्रतारणा झाली आहे असं ते म्हणाले.

<><><><>

नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कूल ऑफ लॉच्या परिसरात उभारण्यात आलेल्या संविधान उद्देशिका पार्कचं उद्घाटन आज सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई, केंद्रीय मंत्री  नितीन गडकरी, आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस  यांच्या हस्ते झालं. पार्कच्या आवारात उभारलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं लोकार्पणही यावेळी झालं. संपूर्ण संविधान प्रास्ताविका पार्क हा दोन एकर परिसरात साडेनऊ कोटी रुपये खर्चातून निर्माण करण्यात आला आहे.

<><><><>

कोल्हापूरच्या चित्रनगरीच्या विविध विकास कामांचं भूमिपूजन आणि लोकार्पण आज सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते झालं.  चित्रपट निर्मितीसमोर कलात्मकता, सृजनशीलता तसेच तंत्रज्ञानाची अनेक आव्हानं असून या तंत्रज्ञानाची मागणी जगभर आहे. यासाठी  कोल्हापूर चित्रनगरीत पोस्ट प्रोडक्शनसाठी उच्च दर्जाचे तंत्रज्ञान लवकरच उभारण्यात येणार असल्याचं ते यावेळी म्हणाले. यावेळी पालक मंत्री प्रकाश आबिटकर, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी चित्रीकरणासाठी बांधण्यात आलेल्या मंदिर, वाडा, चाळ, रेल्वेस्थानक आदी इमारतींचं लोकार्पण करण्यात आलं.

<><><><>

विदर्भात जलपर्यटनाला वाव असून भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा कोरंबी येथील जलपर्यटन प्रकल्पाचं काम दर्जेदार व्हावं, अशी अपेक्षा उपमुख्यमंत्री एकनाथ

शिंदे यांनी आज व्यक्त केली. शिंदे यांनी आज या प्रकल्पाची पाहणी केली. त्यावेळी ते बोलत होते.

<><><><><>

बुलडाणा जिल्ह्यात मेहकर इथं आणि लोणार तालुक्यात ढगफुटी आणि अतिवृष्टी यामुळे नुकसान झालेल्या भागाची केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज पाहणी केली. नुकसानीचं तातडीनं सर्वेक्षण करावं आणि गरजूंना अन्नधान्य, संसार उपयोगी साहित्य देण्याच्या सूचना जाधव यांनी दिल्या.

<><><><><>

केंद्र सरकारन गुप्तचर संस्था रॉचे पुढील सचिव म्हणून ज्येष्ठ आयपीएस अधिकारी पराग जैन यांची नियुक्ती केली आहे. जैन हे १९८९ च्या बँचच्या पंजाब कॅडरचे आयपीएस अधिकारी असून ते सध्याचे रॉचे प्रमुख सचिव रवि सिन्हा यांच्याकडून पदभार स्विकारतील. मंत्रीगटाच्या नियुक्ती समितीनं त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब केलं आहे.

<><><><><>

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातल्या कोअर आणि बफर झोनमधील व्याघ्र पर्यटन सफारीच्या आरक्षण शुल्कात एक हजार रुपयांनी वाढ करण्यात आली आहे.

या व्याघ्र प्रकल्पातील कोअर क्षेत्रातली सफारी १ जुलैपासून बंद होणार असून ही सफारी १ ऑक्टोबरला पुन्हा सुरू होईल. त्यावेळी हे नवीन दर लागू होतील. नवीन रचनेनुसार, कोअर झोनमध्ये शनिवार - रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीच्या एका सफारीसाठी १२ हजार ८०० रुपये शुल्क आकरलं जाईल. तर इतर दिवशी हे शुल्क ८ हजार ८०० रुपये इतके असेल.

बफर झोन मधील मान्सून पर्यटन सुरू असल्यानं त्याच्या शुल्कात १ जुलैपासूनच वाढ केली जाणार आहे. आठवड्याच्या दिवशी शुल्क ६ हजार रुपये

आणि शनिवार - रविवार आणि सार्वजनिक सुट्टयांच्या दिवशी ७ हजार रुपये इतकं शुल्क आकारलं जाईल.

**<><><><><>**

भाजपा प्रदेश अध्यक्षपदाच्या आणि राष्ट्रीय कार्यकारिणीच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानुसार उद्या, २९ जून रोजी पक्षाच्या राज्य कार्यकारिणी सदस्यांची नावं जाहीर होतील. ३० जून रोजी भाजपा प्रदेश कार्यालयात प्रदेशाध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. १ जुलै रोजी सकाळी १० वाजता प्रदेश अध्यक्षांच्या आणि राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्यांच्या निवडीची घोषणा करण्यात येईल, अशी माहिती प्रदेश निवडणूक अधिकारी आमदार चैनसुख संचेती यांनी दिली आहे.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यातल्या भामरागड तालुक्याच्या कवंडे पोलिस ठाण्याच्या हद्दीतून पोलिसांनी कोरम दरमच्या उपकमांडरला अटक केली. तो भूसुरुंग स्फोट, चकमकी आणि दोन नागरिकांच्या हत्येत सहभागी होता. अंकल उर्फ मन्नू सुलगे पल्लो असं या नक्षलवाद्याचं नाव असून त्याच्यावर राज्य शासनाचं ६ लाख रुपयांचं बक्षीस होतं.

**<><><><><>**

मुंबईच्या हाजीअली जवळच्या समुद्रात अस्थिविसर्जनासाठी समुद्रात गेलेल्या तिघांपैकी दोघांचा बुडून मृत्यू झाला असून एकाला वाचवण्यात आलं आहे. हाजीअली जवळच्या समुद्रात आज संध्याकाळी ही घटना घडली. तिघेजण अस्थिविसर्जनासाठी समुद्रात उतरले असतांना बुडू लागले. पोलिसांनी स्थानिक मासेमारांच्या मदतीने त्यांना समुद्रातून बाहेर काढले. त्यातील दोघेजण मृत झाले असून एकाला नायर रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. त्याची प्रकृती स्थिर आहे.

**<><><><>**

एका महिला कीर्तनकाराची डोक्यात दगड घालून हत्या करण्यात आल्याची घटना छत्रपती संभाजीनगरमधील वैजापूरच्या चिंचडगाव शिवारात शनिवारी सकाळी साडे सहावाजेच्या सुमारास घडली. या हत्येमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

**<><><><>**

भारताविरुद्धच्या टी-२० मालिकेतल्या पहिल्या सामन्यात इंग्लंडनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. पाच सामन्यांच्या या मालिकेतला हा पहिला सामना टेंट ब्रिज नॉटिंग हॅम इथं सुरू झाला. शफाली वर्मा आणि स्मृती मंधना सलामीला उतरल्या आहेत.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या एका षटकांत बिन बाद ६ धावा झाल्या आहेत.

**<><><><>**

सांगली जिल्ह्यात वाळवा तालुक्यात अष्टा इथल्या अण्णासाहेब डांगे इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये पहिलं पाली- मराठी साहित्य संमेलन पार पडलं. संमेलनाचं उद्घाटन ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते झालं. संमेलनाचे  अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस तर स्वागताध्यक्ष माजी ग्रामविकास मंत्री डॉ. अण्णासाहेब डांगे होते. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांना लोकशिक्षक बाबा भारती जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलं. पाली-मराठी भाषेचे पहिले शब्दकोशाकार बाबा भारती यांच्या जन्मशताब्दी निमित्त पुण्यातल्या लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानच्यावतीनं साहित्य संमेलनाचं आय़ोजन केलं होतं.

**<><><><>**

गेल्या २४ तासांत राज्यात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडला.

येत्या २४ तासात पुणे आणि सातारा जिल्ह्यातल्या घाटमाथा परिसरासाठी हवामानविभागानं पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. कोकण किनारपट्टीवर सोसाट्याच्या वाऱ्याबरोबरच साडेतीन ते चार मीटर उंचीच्या लाटा उसळण्याची शक्यता असून लहान होड्यांनी समुद्रात जाऊ नये, असा इशारा भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती केंद्रानं दिला आहे.

**<><><><><>**

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील विविध अभियांत्रिकी आणि देखभालीची कामे करण्यासाठी रविवारी मेगा ब्लॉक घेण्यात येणार आहे. यामुळे लोकल सेवा उशीरानं धावतील.

ठाणे आणि कल्याण स्थानकांदरम्यान सकाळी १० वाजून ४० मिनिटांपासून ते दुपारी ३ वाजून ४० मिनिटांपर्यंत अप आणि डाउन जलद मार्गावर अभियांत्रिकी काम केलं जाणार आहे. या काळात मुंबईहून कल्याणच्या दिशेनं जाणाऱ्या सर्व जलद, अर्धजलद गाड्या त्यांच्या नियोजित थांब्यांव्यतिरिक्त कळवा, मुंब्रा आणि दिवा स्थानकांवर थांबतील. तर कल्याणहून मुंबईच्या दिशेनं येणाऱ्या अप जलद, अर्धजलद गाड्या कल्याण आणि ठाणे स्थानकांदरम्यान अप धिम्या मार्गावर वळवल्या जातील.

**//<><><><><>//**